**महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत राज्य आधारसामग्री प्राधिकरण अंतर्गत "Global Ranking Data Analytics Unit" ची स्थापना करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युबीके-२०२६/प्र.क्र.३१/का-१४१७**
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ :** १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्युबीके-२०२४/प्र.क्र.१३/का.१४१७, दिनांक १४.०३.२०२४
२) सहमुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ ची टिपणी

**प्रस्तावना :**

नियोजन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यित महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प (Maharashtra Strengthening Institutional Capabilities in Districts for Enabling Growth Project-MahaSTRIDE) (MahaSTRIDE) राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या शासननिर्णयानुसार प्रस्तुत प्रकल्पासंबंधीच्या आवश्यक त्या वस्तु व सेवांच्या खरेदी प्रस्तावांना राज्य सुकाणू समितीने मान्यता द्यावयाची आहे.

२. महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या राज्य सुकाणू समितीच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०२५ रोजी बैठकीत महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत राज्य आधारसामग्री प्राधिकरण अंतर्गत "Global Ranking Data Analytics Unit" ची स्थापना करण्यास फलश्रुती-आधारीत कार्यक्रम (P for R) घटकाअंतर्गत दोन वर्षासाठी वार्षिक रु. २,२६,५६,०००/- व एकूण ४,५३,१२,०००/- (जीएसटीसह) इतक्या खर्चास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

Administrative approval is given to the establishment of "Global Ranking Data Analytics Unit" under SDA at an Annual cost of INR 2,26,56,000/- and a total cost of INR 4,53,12,000/- (including GST) for 2 years under P for R component.

सदर मान्यतेच्या अनुषंगाने नियोजन विभागामार्फत प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत राज्य सुकाणू समितीच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या बैठकीत राज्य आधारसामग्री प्राधिकरण अंतर्गत "Global Ranking Data Analytics Unit" ची स्थापना करण्यास फलश्रुती-आधारीत कार्यक्रम (P for R) घटकाअंतर्गत दोन वर्षासाठी वार्षिक रु. २,२६,५६,०००/- प्रमाणे एकूण ४,५३,१२,०००/- (जीएसटीसह) इतक्या खर्चास राज्य सुकाणू समितीने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी सदर प्रस्तावास सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता घेण्याची जबाबदारी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची राहील.

२) कामाची कुठल्याही प्रकारे पुनरावृत्ती होणार नाही याची जबाबदारी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) यांची राहील.

३) सदर काम विहीत कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची राहील.

४) प्रकल्प अंमलबजाणी यंत्रणेने आवश्यक त्या तांत्रिक बाबींची, शासनाच्या नियम व निकषांची पुर्तता झाली आहे याची खात्री करावी.

५) शासनाच्या विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

६) सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावा.

७) राज्य शासनामार्फत वेळोवळी निर्गमित करण्यात आलेले आदेश, शासन निर्णय, नियम, परिपत्रक यांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

८) सदर काम हे जागतिक बँक कर्ज सहाय्यित प्रकल्पामधून होत असल्याने जागतिक बँकेशी झालेल्या करारातील नमूद करण्यात आलेल्या अटींचे पालन करावे.

९) संबंधित विभागांशी समन्वय करुन सदर काम विहीत कालावधीत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची राहील.

२. यासाठी येणारा खर्च नियोजन विभाग, मागणी क्र. ओ-०७, ३४५१- सचिवालयीन आर्थिक सेवा , महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प - **MahaSTRIDE ३४५१A२३३ (P for R) जागतिक बँक हिस्सा ७० टक्के** या लेखाशीर्षाखाली भागविण्यास प्रस्तुत शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०२२५१४४१३४००१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MILIND RAGHUNATH KULKARNI

Digitally signed by MILIND RAGHUNATH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=438FA70BB728385B5C81BDE24450C11D5CE0D99ED18A61FB5B1685722E2C2C03, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DB6FB8A1DB6A8793024B0C8728EB79AB35DD0CAE14DDA9621D73EA4347C7856A, cn=MILIND RAGHUNATH KULKARNI
Date: 2026.02.25 14:43:26 +05'30'

**(मिलिंद कुळकर्णी)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति:**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई ३२.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन- निर्मल भवन, नरीमन पॉईंट, मुंबई - २१
५. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.), मंत्रालय, मुंबई.
७. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई

८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या.,मुंवई.
९. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा ‘ कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. वित्त विभाग ( व्यय-८), मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती ( कार्यासन-१४१७)